
# नीना आणि मांजर


फातिमा शराफेद्दिन

चित्रकार : व्हिन्सेंट हार्डी


मराठी अनुवाद : अजित पेंडसे


ज्योत्स्ना प्रकाशन

# नीना आणि मांजर


फातिमा शराफेद्दिन
चित्रकार : व्हिन्सेंट हार्डी
मराठी अनुवाद : अजित पेंडसे



ज्योत्स्ना प्रकाशन




छोट्या नीनाचं तिच्या आई-बाबांना खूप कौतुक होतं.
नीना खूप हुशार होती. ती नवनव्या गोष्टी भराभर शिकत असे.





मोठ्यांचं अनुकरण करण्याचा तिचा प्रयत्न पाहून
सगळ्यांनाच गंमत वाटत असे.
तिच्याबरोबर सगळ्यांचा वेळ मजेत जाई.

पण आज तिच्या आई-बाबांपुढे वेगळाच प्रश्न होता. आजपासून त्या दोघांना जंगलात कामाला जावं लागणार होतं.
नीनाची आई म्हणाली, ''आता नीनाकडे कोण पाहणार?''
''आपल्याबरोबर जंगलात यायला ती खूपच लहान आहे,'' बाबा म्हणाले.
तिथून जवळूनच एक मांजर जात होतं. त्याने आई-बाबांचा हा संवाद ऐकला.
ते त्यांना म्हणालं, ''मी फराह, जवळच राहते. मला जर रोज दूध द्यायचं कबूल केलंत,
तर मी नीनाची काळजी घ्यायला तयार आहे.''



“अरे वा! ही कल्पना तर फारच छान आहे,” आई म्हणाली.
“हो हो,” बाबांनीपण लगेच होकार दिला.






नीनाला फराहजवळ सोडून
आई-बाबा कामावर निघाले.
आता त्यांना कसलीही काळजी नव्हती.






'नीनाला सांभाळेन म्हटलं खरं
पण दिवसभर हिच्याबरोबर करायचं काय?'
फराह विचार करू लागली.
इतक्यात तिला एक छान कल्पना सुचली,
''आयडिया! मला जे काही येतं ते सारं मी तुला शिकवते.''


नीनाला ही कल्पना फारच आवडली.
नवीन काही ना काही शिकायला ती नेहमीच तयार असे.



रोजच्या रोज नीना काहीतरी नवीन शिकत असे.
झाडावर चढणं... पक्ष्यांना घाबरवणं...
छोट्या छोट्या प्राण्यांवर झडप घालणं...
नीनाला या सगळ्याची फार गंमत वाटे.




रोज संध्याकाळी, नीनाचे आई-बाबा जेव्हा परत येत तेव्हा नीना मजेत असे. नीनाला फराहबरोबर हसता खेळताना पाहून त्यांनाही आनंद वाटे.




''काय दंगा चाललाय बघ त्यांचा,'' बाबा म्हणत.
''हो ना! छान जमलंय दोघींचं,'' आई म्हणे.

एक दिवस नीनाच्या मित्राचा वाढदिवस होता.
त्याच्या वाढदिवसाच्या पार्टीचं त्यांना बोलावणं आलं.
नीना तयार होऊन आईबरोबर पार्टीला गेली.



पार्टीला अनेक जण आले होते. सगळी बच्चे कंपनी धमाल करत होती.
नीना मात्र एकटीच एका बाजूला अंग चाटत बसली होती.
इतर हत्ती म्हणाले, ''अशी काय ती, मांजरासारखं अंग काय चाटत्ये!
तिला काय शिकवलंय की नाही तिच्या आई-बाबांनी?''






इतक्यात नीना झाडावर चढली. हे पाहून साऱ्याच हत्तीणींनी बोलायला सुरुवात केली, "काय हे! झाडावर हत्ती? ही म्हणजे लाजच आणणार आहे आपल्या सर्वांना!"




एकीने नीनाच्या आईला विचारलं, "काय गं? मुलीला काही आपल्या चालीरीती शिकवता की नाही? अगदी मांजरासारखीच वागत्ये ती!"
इतक्यात दुसरी मोठी हत्तीण म्हणाली, "चार रट्टे दे सोंडेने, त्याशिवाय सुधारायची नाही ती!"
सगळ्यांची ही बोलणी ऐकून नीनाच्या आईला फारच अवघडल्यासारखं झालं.

रात्री आई-बाबा नीनाबद्दल बोलत होते.
तिच्या काळजीने दोघांची झोप उडाली होती.



''उगाच ठेवलं आपण नीनाला मांजराच्या ताब्यात!'' आई म्हणाली.
''हो ना, पण आता लवकरच आपल्याला काहीतरी करायला हवं.
नाहीतर आपण हत्ती आहोत हेच ती विसरून जाईल...'' बाबा काळजीच्या स्वरात म्हणाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी बाबांनी फराहला निघून जायला सांगितलं.
हे काय चाललंय ते नीनाला कळेचना! आईने तिला हळुवारपणे समजावलं,
''आजपासून जंगलात न जाता मीच तुला सांभाळणार आहे.''









सकाळी सगळे हत्ती नदीवर गेले. पण नीना काही पाण्यात उतरायला तयार होईना!
आई पुन्हा पुन्हा तिला हाका मारत होती, ''अगं ये पाण्यात, कसं गार गार मस्त वाटतंय!
एक पाऊल तरी टाकून बघ!''



नंतरचे काही दिवस आईने नीनाला खूप गोष्टी शिकवण्याचा प्रयत्न केला. पण काही उपयोग झाला नाही.
''अगं, आपण हत्तींनी उड्या मारायच्या नसतात. सावकाश चाल बघू जरा, ऐटीत एकेक पाय टाकत.
आणि आपण सगळे बाहेर जातो तेव्हा रांगेतच चालायचं.''






''आपल्या सोंडेचा उपयोग
करून छोट्या फांद्या आणि
झाडं उपटायची आणि
सोंडेनेच तोंडात घालायची.


''किती छान लागताहेत या झाडाची पानं!
बघ तरी असं खाण्यात किती मजा आहे!''
पण नीनाने कधीच ऐकलं नाही आईचं.
आता मात्र आई खरंच निराश झाली.
''तिला कशातच रस वाटेनासा झालाय.
मी इतकं शिकवते आहे तिला, पण जरा तरी ऐकते आहे का बघा.''
मग बाबा तिला म्हणत, ''असा धीर सोडू नकोस.
लवकरच ती विसरेल फराहला....''






एकदा रात्री तिघंही शांत झोपले होते.

इतक्यात त्यांना चीं चीं अशा आवाजाने जाग आली.
तिथे एक उंदीर आला होता.
''बापरे, उंदीर!'' नीनाचे बाबा घाबरलेच.
आईने तर भीतीने उडीच मारली!



दोघांची घाबरगुंडी उडालेली बघून नीना मात्र हसायला लागली.
तिला कळे ना, या छोट्याशा प्राण्याला हे इतके का घाबरताहेत!
तिला हसताना पाहून दोघं बळेबळेच म्हणाले, ''आम्ही काही घाबरलो नाही आहोत. आम्हाला त्या उंदराचीच काळजी वाटत्ये! एवढासा पिटुकला जीव. आम्ही श्वास घेताना सोंडेतसुद्धा ओढला जाईल!''




तोपर्यंत नीनाने पटकन झडप घातली
आणि उंदराला सोंडेने पकडलं.
मग शांतपणे तिने त्या उंदराला बाहेर
नेऊन सोडून दिलं.



नीनाचा तो झपाटा आणि धाडस पाहून
आई-बाबा अगदी चकित झाले.
''रानात राहायचं म्हणजे मांजराकडूनही
काही गोष्टी शिकायलाच हव्यात की!''





आणि पुन्हा नीना आणि फराह
एकत्र मजा करू लागल्या.



ज्योत्स्ना प्रकाशन
www.jyotsnaprakashan.com

9 788179 252611

₹ ५०/-